<u>निशाणी क्रं. ६ खालील आदेश</u>
(दि.०५.०१.२०२३)

०१. सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ ते ४ विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अंतर्गत दावा कलम १-अ,ब,क मधील मिळकतीमध्ये वादीच्या मालकीच्या व कब्जे वहिवाटीत असलेल्या मिळकतीत वहिवाट करण्याच्या हक्कास प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी स्वतः अगर त्यांच्या हस्तकांमार्फत हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादीचे थोडक्यात कथन असे की, दावा मिळकत १-अ,ब,क हया मिळकती वादीच्या मालकीच्या आहेत. हया मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकती असून त्यांच्या वारस हक्काने वादीच्या हिश्यावर आलेल्या आहेत. वादी हा औष्णीक विद्युत केंद्र, दिपनगर येथे नोकरीला होता. त्यामुळे त्याने दावा मिळकती हया त्याचा भाऊ प्रतिवादी क्र. १ व भावाची मुले म्हणजेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांना नफ्याने करण्याकरीता दिलेल्या होत्या. मात्र सन २०१७ मध्ये वादी रिटायर्ड झाला व त्यानंतर सन २०२० मध्ये वादीला कर्क रोगाने ग्रासल्याने त्याला पैशांची नितांत आवश्यकता होती. त्यामुळे त्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांच्याकडे बाकी असलेल्या मागील तीन वर्षांच्या नफ्याची मागणी केली असता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नफ्याची रक्कम देण्यास नकार दिला.

०३. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, दिनांक ०३/०१/२०२० रोजी त्याचे कर्करोगाचे ऑपरेशन झाल्यानंतर त्याने स्वतः शेती करण्याचा निर्णय घेतला व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना सांगितले की, यापुढे त्यांना शेती घरी करायची आहे. तेव्हा प्रतिवादी क्र. १ ते ३ वादीला म्हणाले की, तुला काय कमी आहे, तु इंजिनिअर म्हणून रिटायर झालेला आहे व तुला कर्करोग देखील झालेला आहे, त्यामुळे तु किती दिवस जगणार असे म्हणून यापुढे खिर्डी गावात यायचे नाही, जर आलास तर लक्षात ठेव

असे म्हणून वादीला शेती करण्यास मज्जाव केला. मात्र वादी यांनी दावा मिळकत १-ब व १-क मध्ये केळी पिकाची लागवड करुन स्वतः कसत आहे. प्रतिवादी हे वादीचे नातेवाईक असतांना सुध्दा वादीला शेत कसण्यास त्यांनी त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर वादीने त्यांची मिळकत श्री. डि.के. पाटील यांच्या मदतीने प्रतिवादी क्र. ४ रमाकांत रामदास तायडे यांना कसण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला. मात्र प्रतिवादी क्र. ४ यांनी वादीला असे सांगितले की, तुम्ही शेती करा, तुमच्या शेतात कोण येतो, मी पाहतो असे म्हणून प्रतिवादी क्र. ४ ने वादीला करार करुन देण्याची मागणी केली व दिनांक ३१/०३/२०२२ रोजी त्यांचे मित्र सचिन तेली यांच्याकडून १००/- रुपयाचे तीन स्टॅम्प पेपर मागवून घेतले. त्यानंतर वादीने दिनांक ०६/०४/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ४ यांना दोन वर्षाकरीता दावा मिळकत १-अ,ब,क कसण्याकरीता वहिवाटीचा करारनामा करुन दिला.

०४. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, त्याने दावा मिळकत १अ गट क्र. ३६३ हा त्यांच्या गावातील विलास महाजन यांना बटाईने कसण्यासाठी दिला. त्यावेळी प्रतिवादी क्र. ४ हे वादीला म्हणाले की मी तुमचे काम करुन दिले, मला पैसे दया. वादीने प्रतिवादी क्र. ४ च्या पत्नीच्या मोबाईल फोनवर दिनांक ०८/०४/२०२२ रोजी रक्कम रुपये ६०००/- व दिनांक २७/०४/२०२२ रोजी रक्कम रुपये ५०००/- असे फोन पे ने पाठविले. तसेच दिनांक १७/०६/२०२२ रोजी डि.के. पाटील यांच्या मार्फत रक्कम रुपये २०००/- दिले. मात्र प्रतिवादी क्र. ४ याने वादीला रक्कम रुपये १,००,०००/- ची मागणी केली असता वादीने त्याला नकार दिला. त्यानंतर दिनांक २४/०९/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ४ ने फोन करुन निंभोरा पोलीस स्टेशनला बोलाविले. त्याठिकाणी वादीने प्रतिवादीला पैसे देण्याचे नाकारले असता प्रतिवादी क्र. ४ ने त्यांच्या पत्नीकडून वादीने २,४०,०००/- रुपये घेतले आहेत अशी खोटी तक्रार दाखल करेल अशी वादीला धमकी दिली.

०५. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, त्याने प्रतिवादी क्र. ४ ला पैसे देण्याचे नाकारल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी हात मिळवणी करुन वादीला त्रास देण्यास सुरुवात केली. दिनांक ०२/१०/२०२२ रोजी वादी त्याच्या शेतात गेला असता प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादीला म्हणाले की, शेतात ययाचे नाही व केळी

कापायची नाही, आला तर जिवाला मुकशील, असेही तुझे कमी दिवस राहिले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ४ याने विलास जगननाथ महाजन यांना सांगितले की, केळी पिकाला पाणी दयायचे  नाही, वादीचे शेत कोण करतो, ते मी बघतो असे म्हटले. तसेच प्रतिवादी क्र. ४ याने वादीला शेतात पाय ठेवायचा नाही अशी धमकी दिली. तसेच केळीला पाणी कसे देतोस ते बघतो, आमच्या नांदी लागला तर आम्ही तुझी सर्व केळी कापून फेकून देवू, तू जळगांव येथून येशील तो पर्यंत तुला शेतामध्ये काहीएक दिसणार नाही अशी धमकी देखील दिली.

०६.		वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, तो त्याची दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कसायला देत नाही. तसेच प्रतिवादी क्र. ४ ला पैसे देत नाही म्हणून ते  वादी सोबत अरेरावीची भाषा करुन वादी बाहेर गावाहून त्यांच्या शिवारात शेती कशी करतो ते पाहतो अशी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीला धमकी दिली. वादी हा बाहेरगावाहून त्याच्या दावा मिळकतीत मशागतीाठी ये-जा करतो. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्याला धमकाविल्यामुळे व शेतात येण्यास मज्जाव केल्यामुळे त्याची शेतीतील काम थांबलेली आहेत. त्यामुळे त्याचा शेतीत लावलेला खर्च वाय जावू शकतो व त्याच्यावर उपासमारीची वेळ देखील  येवू शकते व त्याचे आर्थिक नुकसान देखील होवू शकते.  त्यामुळे वादीला हा अर्ज दाखल करणे भाग झाले.

०७.		प्रतिवादी  यांना सदरचे दाव्याचे समन्स मिळून ते सदर दाव्यात हजर झाले. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांची लेखी कैफियत व सदर अर्जास त्यांचे म्हणणे निशाणी क्र. २३ वर दाखल केले. प्रतिवादी क्र. ४ ने त्यांची लेखी कैफियत व सदर अर्जास त्यांचे म्हणणे निशाणी क्र. २५ वर दाखल केले.

०८.		प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांचे अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादी यांच्या लेखी कैफियत मध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, सिताराम बापू पाटील हे वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडिल होते. सिताराम बापू पाटील यांना वादी, प्रतिवादी क्र. १, दत्तात्रय सिताराम पाटील, अरविंद सिताराम पाटील ही चार मुले व सूमनबाई हरी पाटील, विमलबाई जगन्नाथ पाटील व मथुराबाई सुदाशिव पाटील अशा तीन मुली होत्या. त्यापैकी दत्तात्रय सिताराम पाटील यांना सिताराम बापू पाटील यांच्या हयातीत त्यांचे हिश्यापोटी वेगळी शेत मिळकत दिलेली होती. त्यामुळे

दत्तात्रय यांना त्यांचा हिस्सा यापूर्वीच मिळालेला आहे. तसेच सिताराम बापू पाटील हयात असतांना त्यांनी दि. ०२/०२/१९८८ रोजी शेत गट क्र. ३८१, ३७९, ३८० या मिळकती मध्ये हिस्से केले होते. शेत गट क्र. ३६३ ही मिळकत सन १९९९ मध्ये नारायण महाजन वगैरे यांचे कडून खरेदी खताने एकत्र कुटुंबात अरविंद, वादी व प्रतिवादी क्र. १ या तिघ भावांच्या नावाने खरेदी केली. त्यामुळे गट क्र. ३६३ ही फक्त गोपाळ म्हणजेच वादी यांची एकटयाच्या मालकीची होवू शकत नाही. तसेच अरविंद, वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी एकत्र कुटुंबात गट क्र. ३६२ ही शेत जमीन खरेदी घेतलेली होती.

०९. वादी व प्रतिवादी क्र. १ व त्यांचे इतर भाउ- बहीणींचे एकत्र कुटुंबाची संपूर्ण मिळकत म्हणजे शेत गट क्र. ३६२, ३८१, ३६३, ३७९/१, ३७९/२ व शेत गट क्र. ३८० मधील विहीरीवरील हिस्सा अशी आहे. या सर्व मिळकतीचे एकूण क्षेत्र ४ हे. २१ आर असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे तसेच त्यांचे भाउ अरविंद व तीन बहिणी यांचा प्रत्येकी १/६ एवढा हिस्सा आहे. त्यामुळे वादी हा फक्त ७० आर जमिनीचा सहमालक असून त्यांचे हिश्यापेक्षा जास्त म्हणजेच दावा कलम १ अ, ब व क मधील एकूण क्षेत्रफळ १हे. ९६आर एवढया मिळकतींबाबत वादीला मनाई हुकूम मागण्याचा कोणताही अधिकार नाही. वादी, प्रतिवादी क्र. १ व त्यांच्या इतर भाउ-बहिणीं मध्ये वाटणी झालेली नसल्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. १ हे दावा कलम १-अ,ब,क या मिळकतींचे सहमालक आहेत. त्यामुळे वादी यांना प्रतिवादीं विरुध्द मनाई हुकूमाची मागणी करता येत नाही.

१०. प्रतिवादी क्र. १ ते ३ चे पुढे असेही म्हणणे आहे की, नोंद क्र. ७३७ प्रमाणे अरविंद, प्रतिवादी क्र. १ व वादी यांच्या नावे वेगवेगळया मिळकती एकत्र कुटुंबाच्या सोईसाठी तसेच शासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी केलेल्या होत्या. वादी व प्रतिवादी क्र. १ व त्याचे भाउ अरविंद व त्यांच्या बहिणींमध्ये सरस-निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत. नोंद क्र. ७३७ करते वेळी वादी यांनी नंतर आपण सर्वांचे नावे सरस-निरस मानाने येणारा हिस्सा आपसात करुन घेवू असे सांगितले होते. परंतु वादीने तसे न केल्यामुळे अरविंद पाटील यांनी नोंद क्र. ७३७ रद्द करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांच्या कडे अपील दाखल केले होते. ती अपील मा.

जिल्हाधिकारी यांनी मान्य करुन नोंद क्र. ७३७ रद्द केली होती. त्यानंतर वादी यांनी सदर आदेशाविरुध्द मा. आयुक्त नाशिक यांच्या कडे मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला आव्हाणीत केले होते. मा. आयुक्त नाशिक यांनी नोंद क्र. ७३७ ही कायम करण्याचा आदेश केला. परंतु अरविंदने सदरचा आदेश मंत्रालय मुंबई येथे रिव्हीजन अर्ज दाखल करुन आव्हाणीत केला होता व त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ हजर झाले व त्यांच्यामध्ये सदरच्या प्रकरणात घरीच समझोता झाल्यामुळे आपसात निकाली काढलेला होता. आपसात समझोता झाल्याप्रमाणे एकत्र कुटुंबाच्या संपूर्ण मिळकती मध्ये अरविंद, वादी व प्रतिवादी क्र. १ यांना समान हिस्सा देण्याचे ठरले होते व तिनही बहीणींचे नावे वारस हक्काने ७/१२ ला लावून हिस्सा न घेतल्यास त्यांचे हक्क सोड करुन संपूर्ण मिळकत ही तिनही भावांनी वाटे-हिस्से करुन ताब्यात घेण्याचे असे ठरले होते. तसेच नोंद क्र. ७३७ ही रद्द करुन घेण्याचे देखील ठरले होते. परंतु जो पर्यंत वाटणी होत नाही तोपर्यंत एकत्र कुटंबातर्फे संपूर्ण मिळकत एकत्र ठेवून मेहनत मशागत करुन येणारा उत्पन्नातील हिस्सा अरविंद, वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी आपसात वाटून घ्यायचे ठरले होते. त्याप्रमाणे समझोता पत्र सुध्दा तयार करण्यात आले होते. सदरची बाब वादी यांनी न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे.

११. वरील समझोत्या प्रमाणे सध्यास्थिती दावा कलम १-अ,ब,क मधील मिळकत व इतर एकत्र कुटुंबाच्या मिळकती हया वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ व त्यांच्या बहिणंच्या एकत्र मालकी व कब्जात आहेत. शेवटी प्रतिवादींनी वादीचा मनाई हुकूमाचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१२. प्रतिवादी क्र. ४ यांनी त्यांचा कैफियत व खुलाशा मध्ये असे नमुद केले आहे की, वादीने त्यांना दावा कलम १-अ, ब, क मधील मिळकत ही नफे बटाईने करण्याचा करारनामा लिहून दिलेला होता. परंतु प्रतिवादी क्र. ४ हे करारनाम्याप्रमाणे मजुरांसह वेळोवेळी दावा कलम १-अ,ब,क मधील मिळकतीवर गेले असता प्रतिवादी क्र. ४ ला प्रतिवादी क्र. १ ते ३ चा ताबा दावा कलम १-अ,ब,क वर दिसला. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रतिवादी क्र. ४ ला दावा कलम १-अ,ब,क मधील मिळकती मध्ये घुसु दिले नाही. पुढे त्यांनी असेही म्हटले आहे की, वादी व त्यांच्यामध्ये आता समझोता झालेला आहे व करारनामा देखील रद्द केलेला आहे.

त्यामुळे त्यांची वादी विरुध्द कोणतेही म्हणणे व मागणे राहिले नाही असे सांगितले आहे.

१३. मी, वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच अर्ज व प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेले कागदपत्रे पाहीले. यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहेत. त्यांचे निष्कार्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दा | .. | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| ०१ | वादीने त्याच्या बाजुने सकृत दर्शनिय केस असल्याचे सिध्द केले आहे काय ? | .. | नाही. |
| ०२ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे त्याने सिध्द केले काय ? | .. | नाही. |
| ०३ | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे न भरुन येणार नुकसान होणार असल्याचे त्याने सिध्द केले काय ? | .. | नाही. |
| ०४ | आदेश काय ? | .. | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

<u>कारणमिमांसा</u>

१४. वादीने शेत गट क्र. ३६३ चा ७/१२ उतारा, शेत गट क्र. ३७९/१ चा ७/१२ उतारा, शेत गट क्र. ३८१ चा ७/१२ उतारा, सन २०२२-२०२३ चा खाते उतारा, दावा मिळकत अ,ब व क चा भुमी अभिलेख यांचेकडील नकाशा, दावा मिळकत शेत गट क्र. ३६३ चे सहा फोटोग्राफस, दावा मिळकत शेत गट क्र, ३८१, ३७९/१ मधी जुनी केळीचे तीन फोटोग्राफस, सुनिल व्हीजन यांचेकडील फोटोंचे बील, प्रतिवादी क्र. ४ ने वादी कडून करुन घेतलेल्या स्टॅम्प पेपरचे तीन झेरॉक्स प्रती, वादीने प्रतिवादी क्र. ४ च्या पत्नीला फोन पे द्वारे पाठविलेल्या पैशांची विवरण पत्राच्या झेरॉक्स प्रती, वादीने शेत गट क्र. ३६३ च्या लागवडी साठी केळी टीश्यु रोपांचे राम बायोटेक यांची कडील बिलाची झेरॉक्स प्रत, वादीचे तेरना हॉस्पीटल मुंबई येथील डिस्चार्ज समरीची झेरॉक्स प्रत, वादीचे आदीत्य हॉस्पीटलचा मुळ रिपोर्ट व

विलास महाजन यांचे शपथपत्र, दिनांक ०२/०२/१९८८ रोजीची नोंद क्र. ३३९ ची झेरॉक्स प्रत, दिनांक ०७/०३/१९९२ रोजीची नोंद क्र. ४५१ ची झेरॉक्स प्रत, दिनांक २६/०४/२००१ रोजीची नोंद क्र. ७३७ ची झेरॉक्स प्रत व दिनांक १४/०२/२००५ रोजी नोंदविलेल्या दस्ताची झेरॉक्स प्रत हे दस्तऐवज दाखल केले आहेत.

१५. प्रतिवादीं यांनी पुढील दस्तऐवज दाखल केले आहेत. ड पत्रक नोंद क्र. ३४९ ची झेरॉक्स प्रत, ड पत्रक नोंद क्र. ३३९ ची नक्कल प्रत, ड पत्रक नोंद क्र. ६५० ची नक्कल प्रत, सिताराम बापू पाटील यांचेकडील इलेक्ट्रीक बिल, गोपाळ सिताराम पाटील यांची सोसायटीची पावती, गोपाळ सिताराम पाटील यांची जळगांव जिल्हा देखरेख सह. सोसायटीची पावती, गोपाळ सिताराम पाटील यांची विविध कार्याकारी सोसायटीची पावती, जगदीश कोचुर यांचा दुबार शेत जमिनीचा करारनाम्याची झेरॉक्स प्रत, विवेक भिमराव यांना लिहून दिलेल्या करारनाम्याची झेरॉक्स प्रत, वादी व प्रतिवादी यांचे आपसात वाटणीचे स्मरण पत्राची झेरॉक्स प्रत, वादी व प्रतिवादी यांचा समझोता लेखाची झेरॉक्स प्रत, प्रतिवादी क्र. ३ यांनी गायत्री अॅग्रोटेक यांचेकडी केळी रोप खरेदी केल्याच्या बीलाची झेरॉक्स प्रत, वादी यांना रक्कम रुपये ७३,०००/- दिल्याचा ऑनलाईन दाखल्याची झेरॉक्स प्रत, वादी यांची कर भरणा पावतीची झेरॉक्स प्रत, प्रतिवादी क्र. ३ यांचे गजानन केला स्पलायर्स यांचीकडील केळी मालाचे बुक, अतुल सदाशिव पाटील यांचे शपथपत्र, संदीप अरविंद पाटील यांचे शपथपत्र, जगदीश सोमा कोचुरे यांचे शपथपत्र, कुलदीप भागवत जैसवाल यांचे शपथपत्र, संतोष दत्तात्रय भंगाळे यांचे शपथपत्र, ज्ञानेश्वर दगडू कोळी यांचे शपथपत्र, शरद दत्तात्रय यांचे शपथपत्र, अपील ९२/२००२ च्या निकालपत्राची झेरॉक्स प्रत व ड पत्रक ७३७ ची झेरॉक्स प्रत इत्यादी दस्त दाखल केले आहेत.

<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत</u> :

१६. तीनही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने एकत्र विचारार्थ घेतलेले आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे वाद मिळकत दावा कलम १-अ, ब, क मध्ये नमुद केलेली मिळकती हया त्यांना त्यांच्या वारसा-हक्का प्रमाणे प्राप्त झालेल्या आहेत. वादी यांनी दावा कलम १-अ, ब, क मधील मिळकतींचे ७/१२ उतारे दाखल केलेले

आहेत. त्या ७/१२ उता-यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा कलम १-अ, ब, क  मिळकती हया वादी यांच्या नावाने आहेत. वादीने यांनी फेरफार नोंद क्र. ७३७ ची प्रत दाखल केलेली आहे. त्या फेरफार नोंदीचे अवलोकन केले असता असे निष्पन्न होते की वादीच्या हिश्यात शेत गट क्र. ३६३ क्षेत्र १हे ०८आर व शेत गट क्र. ३७९/१ ०हे ७८आर हया दोन मिळकती म्हणजेच दावा कलम १-अ, क या मिळकती वाटणी द्वारे प्राप्त झालेल्या आहेत. तसेच वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये झालेल्या मोबदला खरेदीखताची प्रत दाव्यासोबत दाखल केलेली आहे. त्या मोबदला खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी  प्रतिवादी क्र. १ यांना त्यांच्या हिश्यात आलेली शेत गट क्रमांक ३७९ मधील एकूण ७८आर पैकी ३३आर शेत जमिन ही प्रतिवादी क्र. १ यांना दिली व प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांच्या नावे आलेली शेत गट क्र. ३८१ मधील शेत जमिन ही वादीला दिली. फेरफार नोंद ७३७ व वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्या मध्ये झालेला मोबदला खरेदीखत प्रमाणे वादी यांनी पुर्वी दावा कलम १-अ,ब,क मधील मिळकत वाटणी प्रमाणे मिळाली होती असे प्रथमदर्शनी दिसत आहे.

१७.     याउलट प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा कलम १-अ, ब, क व शेत गट क्र. ३६२, ३७९/२ व शेत गट क्र. ३८० वरील विहीरीवरील हिस्सा या मिळकती हे वादी, प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाउ अरविंद तसेच त्यांच्या तीन बहीणी सुमनबाई हरी पाटील, विमलबाई जगन्नाथ पाटील व मथुराबाई सुदाशिव पाटील यांच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत. त्यामध्ये अदयापपावेतो सरस-निरस मानाने वाटणी झालेली नाही. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, फेरफार नोंद क्र. ७३७ प्रमाणे वादी, प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाउ अरविद यांनी फक्त कुटुंब व्यवस्था म्हणून व शासकिय योजनांचा लाभ व्हावा याकरीता जमिनींची वाटणी केली होती. परंतु त्यामध्ये बहिणींना हिस्सा देण्यात आलेला नव्हता. फेरफार नोंद क्र. ७३७ ची नोंद करतेवेळी वादी, प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाउ अरविंद यांच्यामध्ये असे ठरले होते की, नंतर आपण सर्वांची नावे सरस-निरस मानाने येणारा हिस्सा आपसात करुन घेवू. परंतु वादी यांनी तसे केले नाही. त्यामुळे अरविंद यांनी फेरफार नोंद क्र. ७३७ ही रद्द व्हावी या करीता मा. जिल्हाअधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले होते. त्या अपीलामधील आदेशाप्रमाणे फेरफार नोंद क्र. ७३७ ही नोंद रद्द करण्यात आली

होती. परंतु वादी यांनी सदरील आदेश हा मा. आयुक्त नाशिक यांच्याकडे रिव्हीजन दाखल करुन आव्हानीत केला होता. त्यामध्ये मा. जिल्हाअधिकारी यांचे आदेश रद्द करुन फेरफार नोंद क्र. ७३७ कायम करण्यात आली होती. परंतु अरविंद यांनी मा. मंत्रालय मुंबई यांचेकडे मा. आयुक्तांचा आदेशाला आव्हानीत केले. त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ हजर झाला व त्याप्रकरणामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ व अरविंद यांच्या मध्ये आपसांत समझोता झाला. त्याप्रमाणे मंत्रालय मुंबई यामध्ये प्रकरण निकाली काढण्यात आले. वादी व प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाउ अरविंद यांच्या मध्ये एक समझोता लेख सुध्दा लिहण्यात आला होता.

१८. प्रतिवादींनी त्यांच्या तोंडी कथनांना दुजोरा देण्यासाठी अरविंद याने दाखल केलेले मंत्रालय येथील प्रकरणाची म्हणजेच आरटीएस ३२०४/प्र.क्र.९/ल-६ प्र.क्र. ४९१(१०)२०११ /अ वपु याची आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. त्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अरविंद यांनी दाखल केलेले प्रकरण वादी, प्रतिवादी क्र. १ व अरविंद यांच्यामध्ये आपसी समझोता झाल्यामुळे निकाली काढण्यात आले होते. तसेच वादी, प्रतिवादी क्र. १ व अरविंद यांच्यामध्ये दि. ०३/०१/२०१४ रोजी झालेला समझोता लेखाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्या समझोता लेखचे अवलोकन केले असता असे निष्पन्न होते की, शेत गट क्र. ३६३, ३६२, ३८१, ३७९ व ३८० मधील विहीर या मिळकतीचे वादी, प्रतिवादी क्र. १ व अरविंद यांच्या मध्ये हिस्से-वाटे झालेले नाहीत. पुढे त्या समझोताच्या लेखामध्ये असे सुध्दा नमुद केलेले आहे की, वरील मिळकती हया वादी, प्रतिवादी क्र. १ व अरविंद यांच्या मध्ये सरस-निरस मानाने वाटणी करुन घेण्याचे ठरले होते. तसेच त्यामध्ये असे सुध्दा नमूद केले होते की, जोपर्यंत वाटणी होत नाही, तोपर्यंत गट क्र. ३६३, ३६२, ३८१, ३७९ व ३८० मधील विहीर हया सर्व मिळकती हया वादी, प्रतिवादी क्र. १, अरविंद व त्यांच्या बहीणींमध्ये एकत्र कुटुंबात ठेवून मेहनत मशागत करुन येणारे उत्पन्न तिनही भावांना समान वाटून घ्यायचे आहे. त्या समझोता लेख मध्ये फेरफार नोंद क्र. ७३७ रद्द करुन घेण्याचे सुध्दा ठरले होते. एकंदरीत दि. ०३/०१/२०१४ रोजी झालेला समझोता लेखाप्रमाणे वादी, प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाउ अरविंद हे दावा कलम १-अ, ब, क मधील मिळकती तसेच शेत गट क्र. ३६२, ३७९/२ व ३८० मधील विहीर या

मिळकतींमध्ये सरस-निरस मानाने वाटणी झालेली नाही. त्यामुळे दावा कलम १-अ, ब, क मधील मिळकती हया वादी व प्रतिवादी  क्र. १ ते ३ यांची एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दावा कलम १-अ, ब, क मिळकतीचे सहमालक आहेत. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द मनाई हुकूम मागता येत नाही.

१९.	प्रतिवादी यांनी समझोता लेखावरील साक्षीदार संदीप अरविंद पाटील व अतुल सदशिव पाटील हयांचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहेत. दोन्ही साक्षीदारांच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दोन्ही साक्षीदारांनी वादी व प्रतिवादी क्र. १ तसेच अरविंद यांच्यामध्ये झालेला समझोताच्या लेखाची पुनरावृत्ती केलेली आहे. त्यामुळे दोन्ही साक्षीदार हे प्रतिवादी यांच्या कथनाला दुजोरा दिल्याचे दिसून येते.

२०.	वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाउ अरविंद यांच्यामध्ये झालेला समझोता लेखाची बाब  न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ तसेच त्याचे भाउ अरविंद यांच्यामध्ये झालेला दिनांक ०३/०१/२०१४ रोजी समझोता लेख हा सदर प्रकरणाशी निगडीत आहे. तसेच तो समझोता लेख वादी व प्रतिवादीं यांचे वाद मिळकत तसेच इतर वडिलोपार्जित मिळकतींवर हक्क ठरविण्यासाठी महत्वपुर्ण होता. परंतु वादी यांनी दिनांक ०३/०१/२०१४ रोजीच्या समझोताची लेखाची बाब न्यायालयापासून लपवून ठेवल्यामुळे वादी हा प्रतिवादी क्र. १ ते ४ विरुध्द मनाई हुकूम मागण्यास पात्र नाही.

२१.	फेरफार नोंद क्र. ७३७ प्रमाणे वादी, प्रतिवादी क्र. १ व अरविंद यांच्या बहिणींना हिस्सा न दिल्यामुळे तसेच त्यांच्या हक्क सोड लेख करुन न घेतल्यामुळे फेरफार नोंद क्र. ७३७ ही प्रथमदर्शनी बेकायदेशिर वाटत आहे. एकंदरीत वरील सर्व बाबींचा विचार करता प्रथमदर्शनी असे दिसते की, दावा कलम १-अ,ब,क मधील मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत व त्यामध्ये अदयाप सरस-निरस मानाने वाटणी झालेली नाही. त्यामुळे वादी हयाला प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या विरुध्द मनाईहुकूम मागता येत नाही. त्यामुळे मी <u>मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी</u> देत आहे.

मुद्दा क्रमांक ४ बाबत :

२२. मुद्दा क्रमांक १ ते ३ चे नकारार्थी निष्कर्ष पाहता वादीने दाखल केलेला तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश दाव्याचे अंतिम निकालाच्या वेळी देण्यात येईल.

PRAVIN PRABHULAL YADAV

Digitally signed by PRAVIN PRABHULAL YADAV
Date: 2023.01.10 11:58:42 +0530

रावेर (प्रविण प्र. यादव)
दि. ०६.०१.२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रावेर.